


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : १७ वा गुरूवार दि. १३ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयाच्या भांडार विभागाचे कामकाज खासगी एजंटांच्या हातात?

## भ्रष्टाचारी बोथेंची हकालपट्टी झाली, परंतु भ्रष्टाचार रुग्णालयातच कार्यरत

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात काही केल्या भ्रष्टाचार संपता संपेना अशी स्थिती आहे. भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित करून आता बडतर्फीची कारवाई झालेले प्रकाश नामदेव बोथे राहणार अकोला यांची जिल्हा रुग्णालयातून हकालपट्टी झाली खरी, परंतु अद्यापही भ्रष्टाचार जिल्हा रुग्णालयातच मुक्तपणे खेळतोच आहे. कारण आता येथील भांडार विभागात चक्क खासगी लोकांचा (एजंट) यांचा सुळसुळाट झाल्याचे दिसून येत आहे. हे खासगी बाहेरचे एजंट येऊन भांडार विभागातील कामकाजात दखल देण्याचे काम करीत आहे. विशेष म्हणजे जिल्हा रुग्णालयाचे कासवगतीने चालणारे प्रशासन यासंदर्भात कोणतीही कारवाई करताना दिसून येत नाही.

येथील जिल्हा रुग्णालयात कार्यरत असताना भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांनी दिवसरात्र भ्रष्टाचार केला. उपकरणे-स्टेशनरी खरेदीपासून ते औषधांच्या खरेदीपर्यंत भ्रष्टाचाराचे अनेक प्रताप बोथे यांनी केले. खरे तर बोथे यांची शैक्षणिक पात्रता नसतानाही त्यांना या पदावर बसवण्यात आले होते. मात्र, गेल्या अनेक वर्षांत या ठिकाणी येऊन गेलेल्या जिल्हा शल्यचिकित्सकांनी याची दखल न घेता बोथेंच्या भ्रष्टाचाराच्या वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचे काम केले. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा सातत्याने पाठपुरावा आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या तक्रारी यानंतर प्रकाश बोथे यांची चौकशी झाली आणि अखेर त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करून त्यांची जिल्हा रुग्णालयातून हकालपट्टी करण्यात आली आहे.व भ्रष्टाचारातून कमावलेली संपत्ती सील करण्याचे ही आदेश झालेले आहे.

ही कारवाई झाली तरी जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराचा भस्मासूर मात्र अजूनही या ठिकाणी धुमाकुळ घालतोच आहे. खरे तर बोथेंसारखी भ्रष्टाचाराची कीड भांड़ार विभागातून गेल्यानंतर या विभागाचे कामकाज सुधारण्याची गरज होती. जनतेच्या हितासाठी जिल्हा रुग्णालयाने काम करावे, असे खरे तर अपेक्षित आहे. मात्र, या ठिकाणी बसलेली काही भ्रष्टाचारी बांडगुळं हे भ्रष्टाचाराचे चक्र आजही जोमाने फिरवण्याचे काम करीत आहेत.

जिल्हा रुग्णालयाच्या ब्लड बँकेत खासगी नियुक्त असलेला एक रोजंदारीवरील कामगार गेल्या अनेक दिवसांपासून भांडार विभागात कुंडली मारून बसलेला दिसून येतो. खरे तर त्याची भांडार विभागात काहीही गरज नाही. परंतु वरिष्ठांच्या आशीर्वादाने तो त्या ठिकाणचे कामकाज बघतो. यावरून स्पष्ट आहे की, भांडार विभागात आज जो काही भ्रष्टाचार सुरू आहे, त्यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही हात आहे. संबंधित रोजंदारीवरील कामगार हा भांडार विभागाचे गोपनीय असलेले शासनाचे पासवर्ड वापरून कामकाज सांभाळतो. तसेच सरकारी कॉम्प्युटरचे पासवर्ड त्याच्याकडे आहेत. संबंधित कर्मचाऱ्याला या ठिकाणी कामकाज करण्याचा कोणताही अधिकार नाही. यावरून हे स्पष्ट दिसून येते की, खासगी लोक किंवा एजंट यांच्या ताब्यात भांडार विभाग गेला आहे. भांडार विभागात कार्यरत विद्यमान अधिकारी एकतर कुंभकर्णी झोपेत आहेत किंवा त्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे.




दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचारासंदर्भात वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. त्यात आम्ही अनेकदा म्हटले आहे की, जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचार हा अक्षरशः टोळी बनवून सुरू आहे. या टोळीमध्ये अनेकांचा सहभाग आहे. सामूहिक पद्धतीने चाललेला हा भ्रष्टाचार लवकरात लवकर थांबवण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत हा भ्रष्टाचार थांबत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज काही केल्या शांत बसणार नाही. जिल्हा रुग्णालयातील एका-एका भ्रष्टाचाऱ्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत आपले पत्रकारितेचे कर्तव्य निभावत राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

### विशेष
### चोरीचा मामला, हळू हळू बोंबला

भांडार विभागात एकीकडे भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे, तर दुसरीकडे या ठिकाणी अनेक अजब-गजब प्रकार देखील होताना दिसून येत आहेत. खात्रिलायक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मागील महिन्यात भांडार विभागातून बरेचसे साहित्य चोरीला गेले. सरकारी कार्यालयातून जेंव्हा काही सामान चोरीला जाते, त्या वेळी त्याची तक्रार पोलिसात करून तो माल मिळवण्याचा प्रयत्न अधिकाऱ्यांनी करायला हवा. चोरीची माहिती प्राप्त झाल्यानंतर जेंव्हा शहर पोलिस स्टेशनचे काही अधिकारी, कर्मचारी जिल्हा रुग्णालयात पोहोचले, त्या वेळी त्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी काहीही चोरी झाले नसल्याची माहिती पोलिसांना दिली. यावरून या प्रकरणात आणखी संदिग्धता वाढली आहे. जिल्हा रुग्णालयातील अधिकारी चोरीचे हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. अधिकारी पोलिसांची दिशाभूल का करीत आहेत, यासंदर्भातील सत्य हे पोलिसांनीच तपासणे गरजेचे आहे. परंतु भ्रष्टाचाराने पूर्णतः पोखरलेल्या जिल्हा रुग्णालय प्रशासनातील हे विनोदी प्रकार आणखी किती समोर येणार, हे तर देवच जाणो.




# हर्षवर्धन सपकाळ काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी?

**जनसंचलन/ बुलढाणा**

माजी आमदार तथा राजीव गांधी पंचायतराचे राष्ट्रीय अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ त्यांची नियुक्ती थेट काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी होत असल्याची वार्ता धडकत आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी माजी आमदार असताना अनेक विकास कामे केली आहेत.प्रामुख्याने जळगाव जामोद पट्ट्यातील त्यांनी केलेला आदिवासी भागात विकास मोठ्या प्रमाणावर झाला. काँग्रेसचे ते खंबीर नेते आहेत. त्यांनी काँग्रेससाठी जीवाचे रान केले.त्यांच्या कार्यकर्तृत्वाला पाहून त्यांची नियुक्ती आता काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी होत आहे.याचा गौरव राज्यात होत आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुशिक्षित सुसंस्कृत स्त्रीमन आविष्कारिका!

## संपादकीय लेख

संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने बरं का ग आई व हसू बाई हसू या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला. त्यांच्या जयंतीनिमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा ज्ञानवर्धक लेख वाचकांच्या सेवेत...

संजीवनी रामचंद्र मराठे या विशेषकरून गीतरचना व सुस्वर काव्यगायन यांसाठी मान्यता पावलेल्या एक आधुनिक मराठी कवयित्री. संजीवनीजींचा जन्म दि.१४ फेब्रुवारी १९१६ रोजी महाराष्ट्रातील पुणे या शहरात झाला. त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. शाळकरी वयातच त्यांनी कविता करावयास सुरुवात केली. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या त्या जीए- गृहीतागमा व एमए होत्या. आयुष्याच्या उत्तरार्धात त्या आणि त्यांचे पती खानापूर-बेळगाव सोडून सांगलीस गेले. सांगलीत राम मंदिराजवळच त्यांचा रामकृपा नावाचा बंगला होता. त्यांनी काही दिवस सांगलीच्या शाळेत शिक्षिकेचे काम केले. त्यांना मिना, भारती, अंजू या तीन मुली आणि प्रताप नावाचा मुलगा होता. प्रताप हा वैमानिक होता. अंजूने लग्नानंतर पाठविलेली पत्रे संजीवनीजींनी संपादित करून प्रकाशित केली. त्यांच्या रचनांचा सन १९३२मधील काव्य-संजीवनी हा त्यांचा पहिला संग्रह असला, तरी त्यांची रसिकांना खरी ओळख झाली ती राका या संग्रहातून- काव्य-संजीवनीतील निवडक रचनाही त्यात पुनर्मुद्रीत केलेल्या आहेत.

संजीवनीजींनी काव्यलेखनास प्रारंभ केला तो काळ तांबे व रविकिरण मंडळ यांच्या प्रभावाचा होता. साहजिकच तांबे यांच्या गीतशैलीची सार्वत्रिक मोहिनी आणि रविकिरण मंडळाने निर्माण केलेल्या काव्यगायनास अनुकूल असे वातावरण यांच्या संस्कारांतून त्यांची कविता गेय रूपात अवतरली. त्यांच्या गोड गळ्याची तिला उत्तम जोड मिळाली. रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याची मोहिनीही त्यांच्यावर होती. तांबे यांची जीवनसृष्टी, सौंदर्यशक्ती, तसेच शब्दकला, आविष्कराचे वळण यांचा संजीवनीजींच्या कवितेवरील संस्कार स्पष्ट आहे. तसेच मनोरमा रानडे यांच्या काव्यातून आधुनिक सुशिक्षित, सुसंस्कृत स्त्रीमनाचा विशेषत: तिच्या प्रणयभावनेचा, जो एक सहजमोकळा आविष्कार घडण्यास प्रारंभ झाला होता. त्याची परंपराही त्यांच्या कवितेत पृथगामी स्वरूपात प्रवाहित झालेली दिसते. प्रणयानुभवातील तरल स्पंदने, त्याची स्वप्निलता, अलौकिकता व्यक्त करणारी त्यांची कविता अस्सलपणामुळे व वेगळेपणामुळे विशेष मनोवेधक ठरली. ङ्गशांत सागरी कशास उठविलीस वादळे? हे गीत याचे उत्कृष्ट प्रातिनिधिक उदाहरण होय.

त्यानंतरच्या त्यांच्या कविता संसार, छाया, चित्रा व चंद्रफूल या कवितासंग्रहांतून प्रकाशित झाल्या. भावपुष्प व परिमला हे त्यांचे गीतसंग्रह होत. संजीवनी हा त्यांच्या निवडक कवितांचा संपादित संग्रह होय. तसेच काही बालगीतसंग्रह व लाडकी लेक ही अनुवादित बालकादंबरिका यांचाही त्यांच्या साहित्यसेवेत समावेश होतो. स्वप्नाळू प्रणयिनीचे व संसारी गृहिणीचे भावविश्व चित्रित करणारी त्यांची कविता प्राधान्याने स्वत:तच केंद्रित झाली आहे. आपल्या भाविश्वाचे भान विसरून स्वत:पलीकडच्या एखाद्या अनुभवाशी एकरूप झाल्याची ङ्गएक सानशी कळशीफ सारखी उदाहरणे मोजकी आहेत. आत्मप्रतीतीच्या परिघाबाहेर गेले, की त्यांची कविता सांकेतिक व क्षीण होते. हा राष्ट्रप्रेमाचा आविष्कार त्यांच्या रचनेतून स्पष्ट होतो.

संजीवनी मराठेंच्या काव्यातून प्रीतीच्या पृथगात्म चित्रणाच्या बरोबरीने सौंदर्यपूजक वृत्ती, सश्रद्धा, वात्सल्यादि स्त्रीसुलभ भाव इत्यादींचा आविष्कारही आढळतो. त्यांचे अनुभवविश्व तसे साधे, व्यापक व व्यामिश्रता या दृष्टीने मर्यादित असले तरी या कवयित्रीने आत्मप्रत्ययाशी व स्वत:च्या काव्यप्रकृतीशी प्रामाणिक राहून निर्मितीतील स्वत्व जपले, हे महत्त्वाचे! त्यांच्या अनुभवविश्वाला असलेला निरागसतेचा रंग हे त्याचे एक वेधक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या पुढील काळातील रचनांवर मराठी काव्यातील नवीन प्रवाह, स्थित्यंतरे यांचे बाह्य संस्कार झालेले दिसतात. यातून अनुभवातील अंतर्मुखता तसेच रचनेतील साक्षेप व संयम वाढलेला दिसला, तरी त्या कवितेचा गाभा तोच राहिला आहे. संजीवनीजींच्या बालगीतांचा स्वतंत्र उल्लेख व स्तुती करणे आवश्यक आहे. मुलांचे अनुभवविश्व साकार करण्याचे श्रेय त्यांनी प्रौढ जाणिवेचे वा भाषेचे वजन येऊ न देता अस्सलपणे मिळविले. महाराष्ट्र शासनाने बरं का ग आई व हसू बाई हसू या त्यांच्या बालगीत संग्रहांना प्रथम पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव केला.
संजीवनी मराठे यांचे महाराष्ट्रातील विद्येचे माहेरघर समजल्या जाणारे पुणे येथे दि.१ एप्रिल २००० रोजी निधन झाले.
!! जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

# अजित गायकवाड यांची एमपीएससी मधून महसूल सहाय्यक पदी निवड

**जनसंचलन/मलकापूर पांग्रा** जिद्द असली तर अनेक गोष्टी ह्या सफल होत असतात एम पी एस सी या अवघड परीक्षेमध्ये अनेकांना लवकर यश प्राप्त होत नाहीत परंतु सिंदखेडराजा तालुक्यातील देऊळगाव कोळ येथील तरुण अजित गायकवाड याने अडीच वर्ष खडतर अभ्यास करून एमपीएससीच्या परीक्षा पास केली व अजित गायकवाड यांचे एमपीएससी मधून महसूल सहायक पदी निवड झाली आहे ,
शेतकरी कुटुंबातत जन्म झाल्याने संघर्षाचा बाळकडू सुरुवातीपासूनच त्याला मिळाला आहे ,शेती बरोबर अभ्यास सुद्धा तो करायचा अभ्यास करत असताना आरोग्याच्या अडचणी त्याला खूप आल्या त्यांच्या मित्रांनी त्याला खंबीरपणे साथ दिली तू हुशार आहेत त्याला सतत प्रोत्साहित केले त्यामुळे त्याचा आत्मविश्वास आणखीन वाढला अजित गायकवाड या यशाचे श्रेय त्यांच्या आजोबांना देतात तिच्या आजोबांनी मित्र म्हणून त्याला खंबीर साथ दिली मानसिक आधार दिला तुमच्या आजोबाचे नाव सुधाकर मोरे माजी सरपंच नायगाव हे चिखली तालुक्यातील आहेत त्यांनी नातवाला भरपूर सहकार्य केले .



त्यामुळे खऱ्या अर्थाने अजित ललिता गजानन गायकवाड यांनी मिळवलेले एमपीएससीच्या परीक्षेतून महसूल सहाय्यक नक्कीच इतरांना आदर्श घेण्यासारखे आहे .

# परत शरद पवारांच्या विचाराचं वादळ घोंगावणार!




**जनसंचलन/ लोणार**
डॉ.राजेंद्र शिंगणे म्हणाले की,परत शरद पवारांच्या विचाराचं वादळ जिल्ह्यात घोंगावणार आहे. १० जून १९९९ ला शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. तेव्हाच काही माणसे अशी चर्चा करायची की हा पक्ष किती दिवस चालणार आहे, काही जिल्ह्यांपुरतं मर्यादित असलेला या पक्षाला भवितव्य तरी काय ? परंतु पवार साहेबांनी दोन महिने अगोदर स्थापन केलेला या पक्षाने महाराष्ट्रात सत्ता स्थापन केली.एक वेळ नव्हे तर अनेक वेळेस केले.केंद्रात देखील सत्तेत सहभागी झाला. महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका ,पासून अनेक सत्ता स्थान काबीज केलीत.अनेक चढ-उतार, पक्ष फुटी पाहिली तरी देखील पक्षाची वाटचाल चालूच आहे.मागच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पक्षाला मिळालेल्या अपयशातून देखील पुन्हा नव्याने पक्ष फिनिक्स भरारी घेईल व जिल्ह्यात देखील शरद पवारांच्या विचारांचा संघटन आम्ही नव्याने निर्माण करू, असे मत राष्ट्रवादी नेते तथा माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी भवन ,बुलढाणा येथे बैठकी प्रसंगी केली केले. बैठकीच्या अध्यक्ष स्थानी सौ रेखाताई खेडेकर जिल्हाध्यक्ष तर प्रमुख उपस्थितीमध्ये नरेश शेळके जिल्हा कार्याध्यक्ष ,साहेबराव सरदार माजी जिल्हाध्यक्ष ,भास्कर काळे प्रदेश उपाध्यक्ष तथा इतर नेते होते.
यावेळी प्रास्ताविक भाषणात नरेश शेळके यांनी सांगितले की पक्ष विभाजनानंतर लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात आपल्या पक्षाला ८० चा स्ट्राईक रेटने विजय मिळाला. विधानसभेत देखील कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी सत्तेत येणार असे अंदाज असताना महाविकास आघाडीचा पर अजय झाला . परिणामी आपल्या पक्षाला देखील मोठ्यापराभवाचा सामना करावा लागला. तरीदेखील आपल्या सर्वांचे नेते शरद पवार साहेब परत नवीन उमेदीने कामाला लागलेत. आपण सर्वांनी देखील या संकटाला संधी म्हणून पाहिलं पाहिजे व जीवाभावाचे नवीन निष्ठावान कार्यकर्ते पक्षाला जोडून नवीन मजबूत संघटन उभे करण्याचा संकल्प करूया. कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा जिल्हाध्यक्ष रेखाताई खेडेकरांनी देखील कार्यकर्त्यांना सदस्य नोंदणीच्या माध्यमातून संघटनेमध्ये चांगल्या कार्यकर्त्यांचा समावेश करावा अशी सूचनात केली.

यावेळी साहेबराव सरदार, भास्करराव काळे, अभय चव्हाण ,डॉ. ज्योतीताई खेडेकर, वनिता गायकवाड, शेख साबीर, गजानन चित्ते, मोहन पाटील, डॉ शरद काळे यांनीही आपले विचार व्यक्त केले.यावेळेस अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष संघटनेबाबत सूचना केल्या

यावेळी संतोषराव रायपुरे, संगीतराव भोंगळ ,पांडुरंग दादा पाटील, गंगाधर जाधव, बीटी जाधव ,रफिक शेठ, अनिता शेळके ,लक्ष्मी शेळके , अनिल वर्मा, आफताब खान ,तुळशीराम दादा काळे अनिल बावस्कर ,सत्तार कुरेशी, रामदास शेठ भोंडे ,सुनील सोनवणे ,नसीम शेठ, कबीर भाई ,रामराव नाईक ,भगवानराव शेळके, गणेश कोरके, प्रभाकर काळवाघे, दीपक मस्के , संदीप मापारी पाटील. रवींद्र तोडकर ,राजूभाऊ जावळे ,अरुण मोगल ,, राजाभाऊ राहटे ,सदानंद तेजनकर ,सुरेश बोंद्रे गणपत गजानन वायाळ ,बाळासाहेब पवार, गजानन चेके रवी इंगळे, गजानन पवार ,अतुल लोखंडे, प्रमोद सपकाळ यांच्यासह जिल्ह्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी संचलन पी एम जाधव यांनी केले.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदेंचा धक्का, भाजपचा धमाका; एकाच दिवशी ठाकरेंना डबल झटका...



**सिंधुदुर्ग:** कोकणात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला एका पाठोपाठ एक धक्के बसत आहेत. विधानसभा निवडणुकीत कोकणात उद्धवसेनेचं अक्षरशः पानीपत झालं. पक्षाला कोकणात केवळ १ जागा निवडून आणता आली. त्यानंतर आता पक्षाला कोकणात गळती लागली आहे. माजी आमदार राजन साळवींनी आज ठाकरेंना जय महाराष्ट्र केला. उद्या ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. त्यानंतर आता भारतीय जनता पक्षानंही ठाकरेंना धक्का दिला आहे. शिवसेनेनं रत्नागिरीत ठाकरेंना झटका दिलेला असताना भाजपचे कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सिंधुदुर्गात धमाका केला आहे. त्यांच्या उपस्थितीत ठाकरेंचे नगरसेवक आज हाती कमळ घेणार आहेत. कुडाळमधील ठाकरेंचे ७ नगरसेवक आज भाजपमध्ये प्रवेश करतील. काँग्रेसचे २ नगरसेवकदेखील भाजपमध्ये दाखल होणार आहेत. थोड्याच वेळात या नगरसेवकांचे प्रवेश होणार आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरेंच्या पक्षाला कोकणात गळती लागताना दिसत आहे.मुंबई, ठाण्यापाठोपाठ शिवसेना कोकणात विस्तारली. चाकरमान्यांमुळे सेनेचा कोकणात विस्तारला आणि कोकण शिवसेनेचा अनेक दशकं बालेकिल्ला राहिला. पण आता या किल्ल्याला एकनाथ शिंदे णि भाजपनं पद्धतशीर सुरुंग लावला आहे. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर कोकणातले बहुतांश आमदार शिंदेंसोबत गेले. त्यामुळे कोकणातील ठाकरेसेना खिळखिळी झाली.लोकसभा निवडणुकीत ठाकरेंच्या पक्षाला कोकणात भोपळाही फोडता आलेला नाही. तर विधानसभेला ठाकरेंचे ३ पैकी २ आमदार पराभूत झाले. त्यातील एक राजन साळवींनी आज ठाकरेंच्या पक्षाचा राजीनामा दिला. ते उद्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. तर दुसरे माजी आमदार वैभव नाईकदेखील पक्षांतर करतील अशी चर्चा आहे. तपास यंत्रणांचा ससेमिरा त्यांच्यामागे लागलेला आहे.विधानसभा निवडणुकीत कोकण पट्ट्यात ठाकरेंच्या शिवसेनेची धूळधाण उडाली. गुहागरचे आमदार भास्कर जाधव यांना त्यांची जागा राखता आली. तर राजन साळवींचा राजापुरात, तर वैभव नाईकांचा कुडाळमध्ये पराभव झाला. आता त्याच कुडाळमधील ठाकरेसेनेचे नगरसेवक भाजपची वाट धरत आहेत. हा पक्षासाठी मोठा धक्का समजला जात आहे.

# साळवींचा प्रवेश भाजपची चिंता वाढवणारा; शिंदेंच्या आमदारानं प्लान सांगितला...

**रत्नागिरी:** तब्बल १५ वर्षे आमदार राहिलेल्या राजन साळवींनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे. पक्षाच्या उपनेतेपदाचा त्यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ते पक्षात नाराज होते. २००९ ते २०२४ अशी १५ वर्षे आमदार राहिलेल्या साळवींचा गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत राजापूर मतदारसंघात पराभव झाला. तेव्हापासून त्यांच्या पक्षांतराची चर्चा सुरु होती. ते उद्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. साळवींचं पक्षांतर ठाकरेंसाठी धक्का मानला जात आहे. साळवी भाजपमध्ये जातील, अशी चर्चा असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी त्यांना आपल्याकडे खेचत भाजपलादेखील शह दिला आहे. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेनेत २०२२ मध्ये मोठं बंड झालं. त्यावेळी आमदार असलेल्या राजन साळवींनी ठाकरेंची साथ सोडली नाही. तपास यंत्रणांचा ससेमिरा मागे लागूनही ते ठाकरेंसोबत कायम राहिले. पण २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या किरण सामंत यांनी त्यांचा पराभव केला. २००९, २०१४, २०१९ असे सलग तीनवेळा निवडून आलेल्या साळवींना सामंतांनी पराभवाचा धक्का दिला. तेव्हापासूनच त्यांच्या पक्षांतराची चर्चा सुरु होती. त्यांच्या शिवसेना प्रवेशाला स्थानिक आमदार आणि मंत्री उदय सामंतांचे बंधू किरण सामंत यांचा विरोध असल्याचं बोललं गेलं. पण आता किरण सामंतांनी साळवींचं पक्षात स्वागत केलं आहे.आम्ही शत प्रतिशत शिवसेनेचा निर्धार केला आहे. ग्रामपंयायत असेल, नगरपालिका असेल, जिल्हा परिषद असेल, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शतप्रतिशतचा निर्धार आम्ही केलेला आहे. त्यादृष्टीनं राजन साळवींचा पक्षप्रवेश होत आहे, असं आमदार किरण सामंत यांनी सांगितलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी, शतप्रतिशत शिवसेनेसाठी आम्ही ताकद वाढवतोय, असंही सामंत पुढे म्हणाले.भूतकाळात काय झालं त्याचा आता संबंध नाही. राजन साळवींशी माझे अतिशय चांगले संबंध होते आणि आजही आहेत.



निवडणुकीत हारजीत होत असते. त्यांच्याकडे मी कधी शत्रू म्हणून बघितलं नव्हतं. ते माझे प्रतिस्पर्धी होते. त्यामुळे ते पक्षात आल्यानं मला काहीच फरक पडणार नाही. उलट त्यामुळे पक्षाची ताकद वाढेल. लांजा, राजापूरसह रत्नागिरीच्या काही भागांमध्ये पक्ष मजबूत होईल, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.विधानसभा निवडणुकीच्या आधी भाजप पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी २०२९ मध्ये पक्ष स्वबळावर विधानसभा लढणार असल्याचं सांगत शत प्रतिशतची घोषणा दिलेली होती. आता राज्यात महायुती असताना शिवसेना नेते आणि आमदार सामंत यांनी शत प्रतिशतचा सूर आळवला आहे. त्यामुळे सेना, भाजपमध्ये शत प्रतिशतवरुन चांगलीच चढाओढ लागलेली दिसत आहे.

# बंद फ्लॅटमधून दुर्गंधी, उघडताच सारे शॉक, बहीण-भावाचे कुजलेले मृतदेह...

**नालासोपारा :** नालासोपारा पूर्वे कडील एका बंद फ्लॅटमधून दोन भावंडांचे कुजलेले मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ माजली आहे. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी आत्महत्येचा संशय व्यक्त केला असून मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत. हा फ्लॅट आतून बंद होता. तसेच, फॉरेन्सिकच्या पथकांना या ठिकाणी एक विषारी पदार्थही सापडला होता, ज्यामुळे त्यांनी स्वत:चं जीवन संपवल्याचा संशय बळावला आहे. याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, मृत दोन भावंडांपैकी विदेशी कंपनीत नोकरीला असलेला ४० वर्षीय व्यक्ती गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करत होता. तर, त्याची ४५ वर्षीय बहीणही त्याच्यासोबतच राहत होते. हे दोघेही अविवाहित होते. जेव्हा स्थानिक रहिवाशांनी अपार्टमेंटमधून दुर्गंधी येत असल्याची तक्रार केली, तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी माहिती मिळताच घटनास्थळ गाठलं आणि फ्लॅटचं दार तोडून आत प्रवेश केला, तेव्हा पोलिसांना या दोघांचे मृतदेह आढळून आले. पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. तसेच, या प्रकरणाचा तपासही सुरू करण्यात आला आहेयाप्रकरणी मीरा भाईंदर वसई विरार पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, मृत व्यक्ती कर्ज फेडण्यासाठी कुठून आर्थिक मदत मिळते का याच्या शोधात होता. ड्रमिड-डेफ्ने दिलेल्या वृत्तानुसार त्याने सहकाऱ्यांसह विविध लोकांना मेसेज पाठवून आर्थिक मदत मागितली होती. त्याच परिसरात राहणारा पण त्याच्या संपर्कात नसलेल्या त्याच्या भावाने याची पुष्टी केली आहे. पोलिसांनी मृत व्यक्तीच्या मोबाईलमधून अनेक कॉल आणि मेसेजचे पुरावे देखील मिळवले आहेत, ज्यावरुन त्यांना आर्थिक मदतीची गजर असल्याचं दिसून येतं.फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून महत्त्वपूर्ण नमुने गोळा केले आहेत,फ्फ असे एका अधिकाऱ्याने सांगितले, सुरुवातीच्या तपासात दोन्ही




भावंडांनी विषारी पदार्थाचे सेवन केल्याचे दिसून येते. तपास चालू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. मृतदेह शवविच्छेदनासाठी नालासोपारा येथील रूग्णालयात पाठविण्यात आले. त्यानंतर ते अंतिम संस्कारासाठी त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सेल्फी



पावसाळ्यात सेल्फी पॉइंट अक्षरश: बहरून येतात. तशी मनंही फुलारून येतात. एक सेल्फी घेण्याचे कष्ट पाहिले, तर अनेक दिव्य करावी लागतात. मनासारखे सेल्फी येण्यासाठी खरं हसू असण्यापेक्षा खोटं हसू चेहऱ्यावर आणावं लागतं. सेल्फी काढण्याचा आनंद काही वेगळाच.

सेल्फी काढण्याचा मोह अनेकांना आवरत नाही. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सेल्फी म्हणजे नित्याचेच झाले आहे. एखाद्या नवख्या ठिकाणी गेल्यावर सेल्फी घेतला नाही, तर मनाला राहावणार नाही. तहान-भूक हरपून सेल्फी काढले जातात. मित्र-मैत्रिणींच्या गप्पांपेक्षा सेल्फीत वेळ जास्त वाया गेल्याचे दिसून येते. सेल्फी घेण्याचा वसा आता तसा जुना झाला असला तरी मोह मात्र आवरत नाही, हे देखील तेवढेच खरे आहे. सकाळी उठल्यापासून सेल्फी घेताना मॉर्निंग वॉकपासून ही सुरुवात झालेली दिसून येते. सेल्फी ते रिल्स असा प्रवासाचा टप्पा आतासा येऊन ठेपलेला दिसून येत आहे. सेल्फीच्या नादात अनेक वाईट घटनाही घडलेल्या आजवर पाहिल्या आहेत.

मनाचा खरा पारदर्शकपणा, खरा चकचकीतपणा अनुभवायचा असेल, तर तो सेल्फीतूनच अनुभवावा. आतासं जीवन एवढं धकाधकीचं झालं आहे की, खरं हसू चेहऱ्यावर आणतानाही अंतरीच्या दु:खाला पुसावं लागतं. जीवनाचे खडतर प्रवास सेल्फीतून दिसून येत नाही हेच खरे.

आजच्या सुशिक्षित मुलींना गावाकडे शेती करणारा मुलगा नवरा म्हणून चालेल का? असं विचारलं, तर काय उत्तर येईल हे न सांगताच कळेल. पण रिल्सच्या माध्यमातून पाहिलं, तर मुली जीन्स घालून शेती करतानाचे फोटो, व्हीडिओ डाऊनलोड करताना दिसून येतात. पण प्रत्यक्षात शेती करण्याची वेळ आल्यास ती करावीशी वाटली, तर त्यात खरी धन्यता मानता येईल. या रिल्समध्ये अभिनयाचा कस दिसून येतो. लहानांपासून वयस्कर माणसांपर्यंत सारेजण अभिनय करतात. गाण्यांचे, नृत्याचे रिल्स पाहिले, तर आपल्याला आश्चर्य वाटायला नको. कारण आता कुणीही नाचू, गाऊ शकतो. गाण्याची इच्छा अपुरी राहिली असेल, तर ॲपच्या माध्यमातून ती पुरी होऊ शकते. हा आपलाच आवाज आहे का? असे क्षणभर वाटूही शकतं, पण ही खरी वस्तुस्थिती आहे.

मनोरंजनाचा भाग म्हणून आपण यात किती गुंतून राहतो नाही. विरंगुळा म्हणून हे विश्व आता लहानांपासून मोठ्यांपर्यंत अगदी व्यापून उरलं आहे.

एक जमाना असा होता की, वाचनप्रेमींना पुस्तक वाचल्याशिवाय चैन पडत नव्हती. लायब्ररी तुडुंब भरलेल्या दिसायच्या. आता ओस पडू लागल्या आहेत. कारण वाचनाचा ओघ कमी झाला आहे. देवादिकांची पुस्तकं, कादंबऱ्या, कथा, बालकथा, आदी विविध पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानात पडणारी भर आताशी मोबाइलच्या माध्यमातून आपल्याला इतकी जागवणारी ठरली आहे की, अलार्म लावतानाही मोबाइल, खाता-पिता हातात मोबाइल अशी परिस्थिती येऊन ठेपली आहे.

सेल्फीच्या जगतातून माणूस अजून बाहेर आलेला नाही. रिल्सच्या माध्यमातून माणसाच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळते आहे. सासू-सुनेचं नातंही या माध्यमातून घट्ट होताना दिसत आहे. छोट्या बाळाचे बोबडे बोल रिल्सच्या माध्यमातून घराघरात पोहोचत आहेत. खोटी खोटी भांडणं, छोट्या छोट्या स्वरूपात जी लोकांचं मनोरंजन करतील, असे व्हीडिओ लोकांना भावताना दिसू लागले आहेत. विनोदाच्या माध्यमातून हास्याची लकेर उमटत आहेत. आनंदाचा हा परिसस्पर्श, तर नसावा ना? आज लहान मुलांच्या हातात मोबाइल पाहिला, त्यांचा गेम खेळण्याचा स्पीड पाहिला, तर आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही, कारण जग खूप जलद गतीनेच तर पुढे सरसावत आहे. कॉम्प्युटर हा विषय अभ्यासक्रमात आहे. पण तो अनेकांना हार्डही वाटून जातो. पण मोबाइल हाताळताना ही मुलं एखाद्या एक्स्पर्टला मागे टाकतील की काय, असे वाटून जाते. सेल्फी अगदी सहज काढला जातो. गेमचं तंत्र त्यांना अवगत असतं. ऑनलाइनचा खजिना त्यांच्या हातातच असतो. हा एवढा सोपा विषय अभ्यासक्रमात ठेवला, तर दुनिया मुठ्ठीत ठेवूनच ही मुलं वावरतील, असे वाटते. रिल्सच्या माध्यमातून अनेक चेहरे फेमस होऊ लागले आहेत. सेल्फीच्या माध्यमातून धाडसी वृत्ती आत्मसात झालेली दिसून येते. जवळपास मोबाइल हातात आल्यापासून सेल्फी ते रिल्सपर्यंतचा प्रवास हा आजच्या जगात लहानांपासून सगळ्यांनाच आनंद देणाराच मानावा लागेल, असे म्हणायला हरकत नाही.

# वैताग आलाय



वैताग आलाय असे आपण नेहमी म्हणतो. आपल्याला नेमका कशामुळे वैताग येतो? काही सर्वसाधारण उदाहरणे घेऊ या- आज सकाळी इस्त्रीवाल्या भैयानं मस्त इस्त्री करून कपडे आणून दिले. कपाट इतकं भरलं होतं कपड्यांनी की, इस्त्रीचे कपडे ठेवायला जागाच नव्हती. तसं कोंबून ठेवता आलं असतं. पण कपाटातल्या कपड्यांची आणि आता आलेल्या कपड्यांची इस्त्री नक्की मोडली असती. काय करावं कळत नव्हतं. मग दुसरे कपाट उघडले. तिथे तर इतके नवीन कपडे घेऊन ठेवलेले होते की, त्याच्यावरचा टॅगही निघाला नव्हता. इतका राग आला लेकीचा. तरी प्रत्येक पार्टी-फंक्शनला जाताना तिच्याकडे नवीन कपडेच नसतात म्हणून चिडचिड करत असते. ओरडलं तर म्हणते, आई सगळ्यांचा बघून झाला हा ड्रेस फोटोमधून! वन टाइम वेअर म्हणजे एकदाच घालून फेकून द्यायचा का कपडा? ङ्गहोय असंच चिडून म्हणत ती फणकाऱ्याने नेहमीसारखीच तिथून निघून जाते.

पूर्वी पेनांमध्ये शाई भरली जायची. त्यानंतर आलेल्या बॉलपेनाची रिफिल बदलली जायची. कपडा फाटला, तर त्याची पिशवी पिशवी फाटली, तर त्याचं पायपुसणं केलं जायचं. जुन्या साडीचे पडदे केले जायचे. कोणतीही वस्तू सरळ फेकून दिली जायची नाही आणि आता? ङ्गयूज ऑण्ड थ्रोच्या जमान्यात माणसांच्या नात्यांबद्दल काय बोलावं?

मग मी आमच्या चिरंजीवांच्या कपाटाला हात लावला तर तो दुरूनच ओरडला, माझ्या कपाटाला हात नाही लावायचा! तोपर्यंत मी कपाट उघडले होते आणि त्यातून धाडधाड पुस्तकं खाली पडली. तू बाहेरच ठेव पुस्तकं, माझी मी लावून घेईन!, असं म्हणत तोही शर्टची बटणं लावत लावत घराबाहेर पडला. कुठं ठेवणार आहे तो ही पुस्तकं? असा माझ्या मनात विचार आला. जाऊ दे राहू दे असा विचार करत मी मोबाइल हातात घेतला, तर मला काहीच स्क्रोल करून बघता येईना! मोबाइल पूर्णपणे भरला होता.

व्हीडिओ ऑडिओ फोटो आणि फाइल्सनी! तो मला इशारा देत होता की, यातील काही डिलीट करा म्हणून! मी त्याबद्दल सहजच मुलीला विचारले, तर ती कुत्सितपणे हसून म्हणाली, बघ भरून वाहतोय ना तुझा मोबाइल तूही किती जमवून ठेवतेस नको त्या गोष्टी! आपल्या घरात बाई येऊन घर झाडून जाते; परंतु आपल्या मोबाइलला स्वच्छ ठेवण्यासाठी आपल्यालाच झाडू मारावा लागतो! तिच्या बोलण्याकडं दुर्लक्ष करत हे ठेवू का, ते ठेवू? असा विचार करत मी काही फोटो, काही व्हीडिओ मनावर दगड ठेवून उडवले. मोबाइल तर सुरू झाला; परंतु मेंदूत भरलेला बॅकलॉग कसा रिकामा करायचा, याचा मी विचार करत बसले आणि मग डोक्यातील विचारांचा गुंता वाढतच गेला. खरंच, सोडवता येतो का गुंता? अजून हा नवीन विचार त्या गुंत्यात जाऊन अडकला. गुंता वाढतच गेला. वाढतच राहणार! वैताग आलाय.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मिठी सुख-दुःखाची



सारखीच काय गं तुझी कुरकुर असते सुखदा! कधीही बिचारी आनंदी चेहऱ्याने भेटत नाही. सर्वात धाकट्या वन्सबाईचं बाळंतपण झालं आता कसल्या जबाबदारीचे दुःख? नीलिमा नेहमीप्रमाणेच सुखदाशी संवाद साधत होती. तू हस मला. तुझा आणि माझा स्वभाव म्हणजे दोन टोकं. पण आपली घट्ट मैत्री परमेश्वरानं कशी काय जोडली, कोण जाणे? तुझ्याशिवाय कुणाशी मनातलं बोलू पण शकत नाही. अगं बाबांचं हार्टचं ऑपरेशन व्यवस्थित झालं, त्यांची तब्येत चांगली आहे म्हणून जरा सुस्कारा टाकते तोवर यांची बातमी येऊन धडकली काय झालं श्रीरंगला? झालं काही नाही गं! कंपनीत यांना कंपल्सरी व्हॉलेंटरी रिटायरमेंट घ्यायला सांगितली आहे. केवढी समस्या! सुखदा अजून सहा महिने अवकाश आहे ना! शिवाय पाच वर्षांचा पगार, फंड वगैरे देणार आहेत. श्रीरंगला लाखाच्या वर पगार आहे आणि उद्याच दुःख ओढवून आजचं सुख का घालवतेस? वेडी कुठली! चार दिवस सरळ मी सुखात काढू शकत नाही. तू मात्र बघावं तेव्हा आनंदात हसत असतेस. कोणत्या सुखी माणसाचा सदरा घालतेस गं! मला तरी आणून दे. वाट्टेल ती रक्कम मोजेन. नीलम म्हणाली, हा सदरा विकत मिळत नाही. ज्याच्या त्याच्या मनात असतो तोफ तुला नेमकं काय म्हणायचं आहे? नीलम! सुखदा, कुणाच्या पायाखाली सतत हिरवळ असते गं! मध्ये मध्ये काटे टोचणारचं. सुखी माणसाचा सदरा म्हणजे तुझा स्वभाव वाइटातून चांगलं शोधायला शीक जरा. नुसता ५ वर्षांच्या पगाराची गंगाजळी किती दिवस पुरणार? अगं, श्रीरंगला स्वतःचा बिझनेस सुरू करायचा होता. आता त्याच्या हाती भांडवल येईल. तो गप्प बसण्यातला नाही. उद्या धंदा वाढला की कुठं पोचशील? सकारात्मक राहा जरा. वाइटानंतर चांगलं घडत आपलं फक्त लक्ष नसतं. मंजूचा टॉयफॉइड दोनदा उलटला. मी काय स्थितीत होते विचार कर जरा. पैसा गेला. मानसिक स्वास्थ्य तर कुणालाच नव्हतं. पण ज्या डॉक्टरांनी मंजूला मागणीही घातली. आलं की नाही सुख! तूच असा विचार करू शकतेस. मधले तुझ्या कष्टाचं काय? कष्ट कुणाला चुकलेत? जांभूळ ओठावर ठेवलं तर ढकलेल का? म्हणून वाट बघणारी तू! माझ्या बाबांनी लहानपणी माझ्याकडून काही जीवनोपयोगी सुभाषित पाठ करून घेतली होती त्यातलं एक माझा गुरू झालाय.

**सुखास्यानंतर दुःखम्**
**दुखस्थानंतरम सुखम्।**
**चक्रवत परिवर्तन्ते सुखानिच**
**दुःखानिच।।**

पुलंनी जे सांगितलं तेच! चालताना पुढच्या पावलाला मी पुढं आहे याचा गर्व नसतो आणि मागच्याला आपण मागे आहोत याचं दुःख नसतं. कारण त्यांना माहीत असतं की, क्षणाक्षणाला आपली स्थिती बदलणार आहे. सुख-दुःख एकमेकाला सोडून जीवनात राहतच नाहीत. आपण पुष्कळ म्हणू की, या दोघांना बाजूला करू पण आजतागायत कुणीही असो राजा वा रंक त्यांना दूर करू शकत नाहीत. सुख-दुःख नावं दोन असतील. पण ते एकच आहेत. प्रत्येक माणसाला आपापलीच सावली असते. पण इथं सुखाला सावली दुःखाची आणि दुःखाला सावली सुखाची अशी भानगड आहे. अगं या दोघांची मैत्री कधीच कशी कुणाच्या नजरेत येत नाही? तुला सांगू सुखदा ते दोघं आपापसात काय बोलत असतील ते! सुखमित्र दुःखमित्राला म्हणत असेल, मित्रा मला सोडून कधी जाऊ नको हं! तू आहेस म्हणून माझं कौतुक लोकं करतात. ऊन आहे म्हणून सावलीला विचारतात ना, तस्सच माझं आहे बघ! तर दुःखमित्र म्हणत असेल, तुला सोडणं शक्यच नाही. मी आलो की, लोकांची तोंड वाकडी होतात, पण माझ्यापाठी आज ना उद्या तू येशील या आशेने मला सांभाळतात रे! असं म्हणून सुख:दुःख या दोन मित्रांनी प्रेमानं इतकी घट्ट मिठी मारली की, आजतागायत देवालाही ती सोडवता आली नाही. देवही त्यातच अडकले. सुखदा अवाक् होऊन नीलमकडे बघतच राहिली. तिला नीलमचे म्हणणे पटले. तिने नीलमला इतकी घट्ट मिठी मारली की, सुख-दुःखाला देखील ती सोडवता आली नाही.

# अवघा रंग एकचि झाला

नमस्कार माऊली! आज आषाढी एकादशी! हजारो वर्षांपासूनची परंपरा, विठ्ठनामाचा गजर करीत, शेकडो कोस पायी चालत वारकरी, पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेतात ती ही आषाढ वारी!

ही वारी संपूर्ण महाराष्ट्राचे नव्हे जगाचे लक्ष वेधून घेते. अवघ्या महाराष्ट्राचे दैवत पंढरपूरचा विठोबा! विठूमाऊलीचे दर्शन हेच वारीचे साध्य! १३व्या शतकात ज्ञानेश्वर महाराज भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन, सर्वांना एकत्र घेऊन, समतेच्या/एकतेच्या तत्त्वाला धरून वारीत चालू लागले. ओढ विठोबा भेटीची, भेटी लागे जीवाफ स्वतःचे पद, जात, धर्म, कूळ, भाषा सारे विसरून माऊलीच्या धाग्याने वारकरी बांधले जातात. अवघा रंग एकचि झालाफ

आषाढी एकादशीच्या दिवशी सर्व देवतांचे तेज पांडुरंगात एकटवते, असे म्हणतात. या वारीचे वैशिष्ट्य, विठोबा हा सर्वसामान्यांचा देव! प्रत्येक भाविक विनम्रतेने येथे आपला माथा टेकवू शकतो. वारकरी आपल्या शेतातील पेरणीची कामे आटपून



निवांत झाल्यावर वारीत सहभागी होतो. आपल्या काळ्या जमिनीसाठी या सावळ्या विठ्ठलाकडे न चुकता जातो. पंढरीचा वारकरी, वारी चुको न दे हरीफ नित्यनेमाने वारी करणारा (येरझाऱ्या घालणारा) तो वारकरी! पांढरे धोतर, सदरा, टोपी परिधान करून हाती टाळ/भागवत धर्माची पताका, गळ्यात ।।तुळशी हार गळा, गोपीचंदन टिळा; हदयी कळवळा, वैष्णवाचा।।. माता-भगिनी डोक्यावर पाण्याचा हंडा, तुळशी वृंदावन, विठ्ठल-रखुमाई घेऊन ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात, भजन/कीर्तन/अभंग म्हणत, पारंपरिक खेळ खेळत पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. पाऊले चालती पंढरीची वाटफ वारीच्या प्रवासात कुठेही गोंधळ नाही, बाचाबाची नाही. एकमेकांना सांभाळत, कुटुंब म्हणून एक होतात. अवघा रंग एकचि झाला

पंढरपुरात वारकऱ्यांच्या चराचरात विठ्ठलच गवसतो. तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठलफ म्हणूनच त्यांना जन्म मृत्यूचे भय उरत नाही.

।।जन्म मृत्यूची चुकवी फेरी; तोच खरा वारकरी।। वारी माणसांना जोडते. अवघा रंग एकचि झाला

पूर्वी प्रवासाची साधने नसल्याने वारकरी समूह-समूहाने चालत पंढरपूरला जात. आजही विभिन्न साधू-संतांच्या जन्मस्थानापासून तसेच काही गावातील भजनी मंडळ असे समूह एकत्र येऊन, पायीच जातात. चालणे ही शारीरिक तपश्चर्या आहे, असे मानतात. ३५०/४०० लोकांचा समूह, तीच दिंडी होय. त्या दिंडीची जागा, क्रम, क्रमांक, कार्यक्रम, दिंडीचा प्रमुख सारे ठरलेले असते. अवघा रंग एकचि झाला

वारीच्या दरम्यान होणारे रिंगण हे वारीचे वैशिष्ट्य. अलोट गर्दीत, मोकळ्या मैदानात, मोकळ्या जागेतून, अश्व गोलाकार प्रदक्षिणा घालून माऊलीला अभिवादन करतो. अवघा रंग एकचि झाला

भेदभाव वारकरी संप्रदायाला मान्य नाही. म्हणूनच आजच्या संगणक युगातही वारकरी संप्रदाय अधिकाधिक वृद्धिंगत होत आहे. विठ्ठल हा अहिंसेचे प्रतीक आहे. त्याच्या हाती कोणतेही शस्त्र नाही. त्याला कोणत्याही प्राण्याचा किंवा विशिष्ट नैवेद्य दाखविला जात नाही. जे तुमच्याकडे आहे ते सावतामाळी म्हणतो, ।।कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी।। सोने-चांदी काही नको. फक्त तुळशीपत्र त्याला प्रिय. जे सहज उपलब्ध. विठूमाऊली सांगते, प्रपंच, काम सोडून येथे येऊ नका. फक्त मुखी श्रीहरीचे नाव घ्या. मनी विठ्ठलाचे रूप आठवा. रूप सावळे, दिव्य आगळे, अंतर्यामी भरिते फ पंढरपूरच्या आधी काही अंतरावर वाखरी येथे आषाढ शुद्ध नवमीला सर्व पालख्या, दिंड्या एकमेकांना भेटतात. दुसऱ्या दिवशी एकादशीला सकाळी पालखीसहित सारा भवसागर पंढरपूरकडे जाण्यास प्रस्थान करतो. इंद्रायणीपासूनचा हा वारी प्रवास, चंद्रभागेत स्नान करून प्रदक्षिणा घालून जयघोष होतो; पुंडलिक वर दे हरी विठ्ठल मफ २८ युगांपासून भक्तांसाठी विटेवर उभा असलेल्या पांडुरंगाचे ठिकाण श्रीक्षेत्र पंढरपूर! एकनाथ म्हणतात; माझे माहेर पंढरी; आहे भीवरेच्या तिरीफ संत नामदेव म्हणतात, ।।जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर।। आषाढी पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे. ही वारी समर्पण वृत्तीचा कळस साध्य आहे. भागवत धर्माच्या संतांनी पंढरपूर हे तीर्थक्षेत्र नावारूपाला आणले. अवघा रंग एकचि झाला

आषाढी एकादशीच्या संपूर्ण पालखी दिंडी सोहळ्याचे व्यवस्थापन, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेले हे पारंपरिक ज्ञान आहे. आजच्या संगणक युगात २५ लाखांहून अधिक वारकरी ८०० तासांचा ५२० किलोमीटरचा प्रवास सुसूत्रतेने, आनंदाने, देहभान विसरून करीत असतात. सारेच अलौकिक! आमचा पांडुरंग आम्हाला थकू देत नाही. तो आम्हाला बांधून ठेवतो. ही वारकऱ्यांची भावना. अखंड प्रेमाचा कल्लोळ! अशा भक्तांचा उत्साह वारीत बघायला/अनुभवायला मिळतो. काही सेकंदाच्या विठोबाच्या दर्शनासाठी, तीन-चार तास रांगेत उभे राहतात. भक्तीखेरीज कशाचीच अपेक्षा नाही. परमेश्वर प्रेमाची अनुभूती घेऊन ते मागे फिरताना वर्षभराची ऊर्जा घेऊन जातात. मुखी नामस्मरण असतेच. हाच वारीचा आचारधर्म! अवघा रंग एकचि झाला

दैनिक जनसंचलन — निडर निर्भिड — व्यापक जनचळवळीचा प्रहरी!





## शुभमन गिलचा शतकासह महारेकॉर्ड, पहिलाच भारतीय खेळाडू ठरला, ७५ वर्षांत प्रथमच ही गोष्ट घडली

**अहमदाबाद :** शुभमन हा सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे. कारण सातत्यपूर्ण कामगिरी करत गिलने आता अशी एक कामगिरी केली आहे की, आतापर्यंत ती कोणलाच जमलेली नाही. कारण तिसऱ्या वनडेतील शतकानंतर गिलचा अनोखा विक्रम आता समोर आला आहे. गिलने तिसऱ्या वनडे सामन्यात दमदार शतक झळकावले. गिलने यावेळी इंग्लंडच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. गिलने यावेळी धडाकेबाज फटकेबाजी केली आणि इंग्लंडच्या गोलंदाजीची हवाच काढून टाकली. रोहित शर्मा बाद झाल्यावर गिलने विराट आणि त्यानंतर श्रेयस अय्यसच्या साथीने भारताची धावगती वाढवली. गिलने या सामन्यात १०२ चेंडूंत १४ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ११४ धावांची भन्नाट खेळी साकारली. या शतकानंतर गिलचा एक अनोखा विक्रम आता समोर आला आहे.गिलने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात ८७ धावा केल्या होत्या, त्यावेळी त्याचे शतक १३ धावांनी हुकले होते. त्यानंतर दुसऱ्या वनडे सामन्यात गिलने ६४ धावांची खेळी साकारली होती. यावेळीही त्याला शतक पूर्ण करता आले नव्हते. गेल्या दोन्ही सामन्यांत गिल हा शतक करण्यापासून वंचित ठरला होता. त्यामुळे आता तिसऱ्या वनडे सामन्यात गिल कशी कामगिरी करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. पण गिलने यावेळी मात्र आपले शतक पूर्ण केले आणि एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. गिलचा हा ५० वा वनडे सामना होता. आपल्या ५० व्या वनडे सामन्यात आतापर्यंत एकाही भारतीय क्रिकेटपटूला शतक झळकावता आले नव्हते. पण गिलने मात्र ते करून दाखवत कसर भरुन काढली. त्यामुळे आपल्या ५० व्या वनडे सामन्यात शतक झळकावणारा गिल हा पहिलाच भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे. भारताने १९७१ सालापासून वनडे क्रिकेट खेळायला सुरुवात केली. पण तेव्हापासून आतापर्यंत अशी कामगिरी कोणालाही करता आलेली नव्हती, जी गिलने आता करून दाखवली आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आता सर्वच संघांनी गिलचा धसका नक्कीच घेतला असेल. गिलने या वनडे मालिकेत सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. भारताकडून सर्वाधिक धावा गिलच्या नावावर आहेत. त्यामुळे गिलने ही मालिका गाजवली आहे. पण गिलचा हाच फॉर्म चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये कायम राहतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे. त्यामुळे गिलने आता आपल्या दिलेले उप कर्णधारपद किती योग्य आहे, हे दाखवून दिले आहे

# विराट कोहलीने रचला इतिहास, सचिन तेंडुलकरचा मोठा विक्रम मोडत केली भन्नाट कामगिरी...



**अहमदाबाद :** विराट कोहलीने तिसऱ्या वनडे सामन्यात इतिहास रचला आहे. विराट कोहलीने यावेळी सचिन तेंडुलकरचा एक मोठा विक्रम मोडीत काढला असून आता त्याच्या नावावर हा मोठा विक्रम असणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अशी देदिप्यमान कामगिरी करणार विराट कोहली हा भारताचा पहिलाच क्रिकेटपटू ठरला आहे.
विराट कोहली हा धावांचा दुष्काळ अनुभवत होता. त्यामुळे त्याच्यावर जोरदार टीका होत होती. पण तिसऱ्या वनडे सामन्यात विराट कोहलीने बॅटने पुकरलेला संघ मोडीत काढला आणि दमदार फटकेबाजी करत सर्वांची मनं जिंकली. विराट कोहलीने यावेळी अर्धशतक झळकावले आणि तो शतकाच्या दिशेने कूच करायला लागला होता. कोहलीने या सामन्यात जर ८९ धावा केल्या असत्या तर त्याला १४ हजार धावांचा टप्पा पूर्ण करता आला असता.
पण कोहलीने या सामन्यात ५५ चेंडूंत सात चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५२ धावांची दणकेबाज खेळी साकारली.
या अर्धशतकासह विराट कोहलीने सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे.आतापर्यंत इंग्लंडविरुद्धच्या वनडे सामन्यांमध्ये सचिन तेंडुलकरचा दबदबा असल्याचे पाहायला मिळाले होते. सचिनने इंग्लंडविरुद्धच्या वनडे सामन्यांमध्ये आतापर्यंत ३९९० धावा केल्या होत्या. पण कोहलीने या सामन्यात अर्धशतक झळकावले आणि इंग्लंडविरुद्ध वनडे क्रिकेटमध्ये विराटने आता ४ हजार धावांचा टप्पा गाठला आहे. इंग्लंडविरुद्ध भारताकडून वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा मान आता विराट कोहलीला मिळणार आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी विराट कोहलीने अर्धशतक झळकावत आपण फॉर्मात आल्याचे दाखवून दिले आहे. त्यामुळे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आता तो आपले वनडे क्रिकेटमधील १४ हजार धावा कधी करणार, याची उत्सुकता आता सर्वांना लागलेली असणार आहे.
बुधवारी विराट कोहलीकडूनही धावांची बरसात होईल अशी अपेक्षा भारतीय संघव्यवस्थापनाला होती आणि तसेच पाहायला मिळाले. विराट कोहलीने यावेळी दमदार सात चौकार लगावले आणि एक उत्तुंग षटकार लगावला. हा चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारताचा अखेरचा सामना होता. या सामन्यात विराट कोहलीने हे अर्धशतक झळकावत सर्व संघांना सज्जड इशारा दिला आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानचा मैदानात राडा...



**कराची :** चॅम्पियन्स ट्रॉफीला सुरुवात होण्यापूर्वी आता पाकिस्तानच्या खेळाडूंनी आपला रंग दाखवायला सुरुवात केली आहे. पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदीने आता भर मैदानात राडा घातल्याचे पाहायला मिळाले आहे. शाहीन आफ्रिदीच्या या कृत्याचा व्हिडिओ जगभरात व्हायरल झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पाकिस्तानमध्ये खेळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ आला आहे. बुधवारी या दोन्ही देशांत वनडे सामना खेळवण्यात आला होता. या वनडे सामन्यात पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी जोरदार राडा घातल्याचे समोर आले आहे. यावेळी शाहीन आफ्रिदी दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूवर अपशब्द वापरत असल्याचे यावेळी पाहायला मिळाले आहे.ही गोष्ट घडली ती २८ व्या षटकात. त्यावेळी शाहीन गोलंदाजी करत होता. यापूर्वी शाहीनने दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज मॅथ्यू ब्रीट्झकेला डिवचले होते. शाहीन हा चेंडू टाकल्यावर मॅथ्यूच्या दिशेने जाताना दिसत होता. यानंतर काही वेळाने शाहीनने एक टाकलेला चेंडू मॅथ्यूने खेळला आणि त्यानंतर आता माझ्या जवळ येऊ नको, असे बॅटने दाखवले. त्यानंतर शाहीन त्याच्यावर चांगलाच भडकल्याचे पाहायला मिळाले. शाहीन यावेळी मॅथ्यूच्या जवळ गेला आणि त्याला अपशब्द बोलत होता. पण मॅथ्यूनेही यावेळी त्याचा समाचार घ्यायचे ठरवले होते. त्यामुळे या दोघांत जोरदार राडा झाला. पण पंचांनी यावेळी मध्यस्थी केली आणि हा वाद संपवला. पण त्यानंतरच्या चेंडूवर पुन्हा एकदा राडा झाल्याचे पाहायला मिळाले.

# माजी सैनिक भानुदास रामकृष्ण गोरे यांचे निधन...



जनसंचलन/बुलढाणा

: सागवन, बुलढाणा येथिल रहिवासी माजी सैनिक भानुदास रामकृष्ण गोरे यांचे दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी सकाळी ०९:०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे. ते १९५४ साली भारतीय सैन्य दलात भरती झाले. त्यांनी इ. स. १९६२ साली झालेल्या भारत चीन व १९६५ व १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांना १९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात गोळी लागून गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या पश्चात तीन भाऊ भावजया, एक मुलगा सून, तीन मुली जावई, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर १२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०३:०० वाजता सागवन येथिल स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या रक्षा सावडण्याचा कार्यक्रम कार्यक्रम दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०९:०० वाजता सागवन येथिल स्मशानभूमीत होणार आहे.

# देऊळघाट ग्रामपंचायतला झाला तरी काय ?



जनसंचलन/बुलढाणा

प्रतिनिधी इमरान खान

देऊळघाट ग्रामपंचायतला झाला तरी काय ?असा प्रश्न या ठिकाणी उपस्थितीत होत आहे.देऊळघाट ग्रामपंचायत जवळ मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात असुन अनेक ठिकाणी घनकचरा उकिरडे साठलेले आहेत. गावात ठिकठिकाणी वाढते अतिक्रमण व मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरत असल्याकारणाने ग्रामपंचायत कर वसूल करण्यासाठी आहे का?? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रत्येक मासिक सभांमध्ये ग्रामपंचायत यांनी लाखो रुपये शासनाचे २०१९ पासून आज पर्यंत विकासाचा नावाने काढलेले आहे गावातील बस स्टँड ते ग्रामपंचायत कडे जाणारा मुख्य रस्त्यावर नाल्याच्या सांडपाणी वात आहे गावातील त्या लोकांना घाण पाणीतून येना जाना करावे लागत तसेच शाळाचे मुलाबाळांना व अंगणवाडी मध्ये जाणाऱ्या लहान बाळांना पाणी गोंधळून जावा लागत आहे तरी ग्रामपंचायत डोळे उघडत नाही फक्त विकासाचे पैसे खाण्याच्या प्रयत्न करीत आहे त्यामुळे गावाचे गंभीर स्वरूपाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही गावात घाणीचे साम्राज्याचे तसेच पडलेले आहे . ग्रामपंचायत ने २०१९ पासून आज पर्यंत इतएवढे पैसे काढून सुद्धा साफसफाई का झाली नाही याची तात्काळ चौकशी करणे आवश्यक आहे

# जिजामाता महिला बँक उत्कृष्ट बँक पुरस्काराने सन्मानित...

जनसंचलन/बुलढाणा

विदर्भ स्तरावर कार्यरत सर्व को-ऑप बँकेची सलग्न असलेल्या संस्थांना दरवर्षी उत्कृष्टपणे कामकाज करणाऱ्या तसेच सामाजिक दायित्व भावना कायम ठेवून समाजाचे व राष्ट्राचे आर्थिक परिस्थिती सुदृढ करण्याकरिता मोलाचे कार्य करणाऱ्या, त्याचप्रमाणे रिझर्व बँकेचे आदर्श प्रमाणके व निकष पूर्ण करून त्यांनी आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसारच बँकेचे कामकाज करून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्कृष्ट जलद व तत्पर ग्राहक सेवा देणाऱ्या तसेच बँकिंग क्षेत्रात नवनवीन कल्पना आत्मसात करून सतत प्रगती करणाऱ्या बँकांना उत्कृष्ट बँकेचा पुरस्कार देण्यात येतो आर्थिक वर्ष २०२३- २४ करिता बुलडाणा येथील जिजामाता महिला नागरी सहकारी बँकेला विदर्भ अर्बन को-ऑप बँक फेडरेशन नागपूर, तर्फे पुरस्कार प्राप्त झाला आहे सदर पुरस्कार बँकेला मंगळवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ रोजी शेगाव येथे महाराष्ट्र राज्याचे सहकार राज्यमंत्री माननीय डॉ .पंकज भोयर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. असून बँकेचे अध्यक्षा सौ रेखाताई झंवर, उपाध्यक्ष श्रीमती शिलाताई सांबारे, सरव्यवस्थापक दिपक अग्रवाल, यांनी स्वीकारला. सदर पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी बँकेचे अध्यक्ष सौ रेखाताई झंवर उपाध्यक्ष श्रीमती शिलाताई सांबारे व सरव्यवस्थापक दिपक अग्रवाल यांना बँक द्वारा प्रकाशित अर्थ सरिता ही पुस्तक भेट म्हणून यावेळी देण्यात आली.

यात्रसंगी माहिती देताना जिजामाता महिला नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष सौ रेखाताई झंवर म्हणाल्या की बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट ग्राहक सेवा दिले. बँक आपल्या ग्राहकांना नेहमीच आधुनिक तंत्रज्ञानाचा तत्पर व विनम्र सेवा प्रदान करीत आहे. असोशियन तर्फे प्राप्त पुरस्कार हा बँकेचा कामकाजाचा गौरवाचा व प्रतिष्ठेचा आहे तसेच या पुरस्कारामुळे सहकार क्षेत्रात फक्त जिजामाता महिला बँकेचा नावलौकिक झालेला नसून बुलढाणा जिल्ह्याचा नावलौकिक राष्ट्रीय




स्तरावर झालेला आहे, भविष्यात देखील बँकेचा उज्वल प्रगती करता, बँकेच्या सर्व सभासद ठेवीदार, खातेदार व हितचिंतक याचे अनमोल सहकार्य निरंतर मिळत राहील व बँकेचे उत्तरोत्तर प्रगती होत राहील, असा ठाम विश्वास बँकेचे अध्यक्ष सौ रेखाताई झंवर यांनी व्यक्त केला. यावेळी बोलतांना जिजामाता महिला नागरी सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक दिपक अग्रवाल यांनी भाईजींच्या मार्गदर्शनामध्ये व सभासद तसेच ग्राहकांनी दाखविलेल्या विश्वासामुळे पुरस्कार मिळाल्याचे सांगितले. विदर्भ स्तरावर जिजामाता बँकेला मिळालेल्या पुरस्काराबद्दल विविध स्तरावरील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

# बुलाढाणेकर होतील मंत्रमुग्ध! डॉ.सुकेश झंवर यांची उपस्थिती!

## स्व. नरेंद्र लांजेवार स्मृतिदिनानिमित्त गझलरंग!

जनसंचलन/बुलढाणा

येथील सुप्रसिद्ध साहित्यिक, मुक्त पत्रकार, बालवाचन चळवळीचे प्रणेते, ग्रंथपाल स्वर्गीय नरेंद्र लांजेवार यांच्या तिसऱ्या स्मृतीदिनानिमित्त सुरेश भट गझल मंच पुणे प्रस्तुत गझलरंग या दर्जेदार मराठी गझल मुशायराचे आयोजन करण्यात आले आहे. या गझल मुशायराचे सूत्रसंचालन शाहीर सुरेशकुमार वैराळकर हे करणार आहेत. या गझल मुशायरा मध्ये गोपाल , राज रणधीर, प्रियंका गिरी, आत्माराम जाधव कीर्ती वैराळकर इंगोले, अश्विन मोरे, डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे अपूर्व राजपूत हे शायर व गझलकार सहभागी होणार आहेत. दिनांक १३ फेब्रुवारी गुरुवारी सायंकाळी ठीक ०६.३० वाजता गोवर्धन सभागृह बुलढाणा अर्बन मुख्यालय समोर येथे या गझल मुशायराचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमासाठी बुलढाणा अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर यांचेसह जेष्ठ गझल अभ्यासक शिवाजी जवरे , प्रज्ञा लांजेवार यांची सन्माननीय उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमासाठी गझल रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ.



गणेश गायकवाड,प्रा. डॉ.कि.वा.वाघ यांचेसह स्व. नरेंद्र लांजेवार मित्रपरिवार, सहर ए गझल अकादमी बुलढाणा व प्रगती वाचनालय परिवार बुलढाणा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर द्वारे आयोजित परिसंवाद स्पर्धेचा निकाल जाहीर



जनसंचलन/ अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ङ्गलिंगभाव आणि समाजफ या मुख्य विषयावर विद्यापीठातील ज्ञानस्त्रोत केंद्रातील सेमिनार हॉलमध्ये परिसंवाद स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत ङ्गस्थलांतराचा स्त्रियांवर होणारा परिणामम, ङ्गमहिला उद्योजकता : आव्हाने आणि संधीफ आणि ङ्गसमकालीन काळातील पितृसत्तेचे स्वरूपफ असे तीन उप विषय देण्यात आले होते. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख व शिक्षक आणि संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक यांच्या सहकार्यामुळे स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत तक्षशिला महाविद्यालय, अमरावती येथील निधी ज्ञानेश्वर देवरे यांचा प्रथम क्रमांक आला. श्री शिवाजी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील शिवानी प्रदीप जयस्वाल यांचा द्वितीय क्रमांक आला तर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील नितीन नागासेन गवई यांचा तृतीय क्रमांक आला. याशिवाय संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील अक्षरा ज्ञानेश्वर धनधरे व सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अमरावती येथील पल्लवी रमेश गवई यांना प्रोत्साहनपर क्रमांक देण्यात आला. परिसंवाद स्पर्धेतील सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या परिसंवाद सादरीकरण स्पर्धेचे परीक्षण संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मानसशास्त्र विभागाच्या मा. प्रा. वनिता राऊत यांनी केले. यावेळी विचारमंचावर अध्यक्ष म्हणून वुमेन्स स्टडीज सेंटरच्या सह समन्वयक डॉ. वैशाली धनविजय यांसह डॉ. भगवान फाळके उपस्थित होते.

# निर्मिती क्षेत्रात काम करणाऱ्या कारागिरांच्या सहभागाने चिखलीत आगळीवेगळी विश्वकर्मा जयंती साजरी




जनसंचलन/बुलढाणा

चिखली येथील मौनी महाराज संस्थान येथे प्रभू विश्वकर्मा जयंती तथा उद्योग दीन साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद जी लांडे हे होते तर मंचावर उपस्थित जिल्हा उद्योग केंद्राची व्यवस्थापक सुनील पाटील जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे श्रीपाद परळीकर खादी ग्रामोद्योग चे गजानन पाटील चिखली तालुका कृषी अधिकारी श्री सुरडकर साहेब महिला उद्योजिका रेखा ताई बोरकर , आर्ट ऑफ लिविंग चे प्रशिक्षक सुनील भोजवानी या कार्यक्रमाचे संकल्प व मार्गदर्शक कामगार नेते सतीश शिंदे, यावर्षीचा अर्ज समितीचे अध्यक्ष विनोद बापू देशमुख उपाध्यक्ष अझहर भाई सचिव विजय कुटे मंचावर उपस्थित होते

या प्रसंगी चिखली शहरातून विश्वकर्मा प्रतिमेचे भव्य मिरवणूक मोटरसायकल रॅली काढण्यात आली या रॅलीमध्ये बांधकाम क्षेत्रातील सर्व कार्य कारागीर बांधव हजर होते सर्वधर्मसमभाव व एकात्मतेचे प्रतीक या रॅली मधून जाणवले

कार्यक्रमाच्या सुरुवातीला परदेशी करण्याची पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संकल्पना मांडणारे सतीश शिंदे यांनी सांगितले की ज्याप्रमाणे एखादी वास्तू एखादा उद्योग उभा करताना सर्व कारागीर सोबत काम करतात त्याचप्रमाणे या कार्यक्रमासाठी सुद्धा कलेसोबत जोडणारे सर्व कार्य करणे एकत्र येऊन कलेचे आराध्य दैवत प्रभू विश्वकर्मा जयंतीच्या कार्यक्रमाला एकत्र आली पाहिजेत म्हणून दरवर्षीप्रमाणे आजही सर्वांना सोबत घेऊन विश्वकर्मा जयंती साजरी करत आहेत

जिल्हा उद्योग केंद्र ची महाव्यवस्थापक श्री प्रमोद जी लांडे साहेब यांनी सांगितले की विश्वकर्मा जयंतीच्या निमित्ताने उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येऊन आपला उद्योग व्यवसाय इतर प्रत पोहोचवला पाहिजेत नवीन उद्योजकांना यातून प्रेरणा करागरांनी सुद्धा आपल्या मुलांना उद्योग क्षेत्रात पुढे आणले पाहिजेत त्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र पूर्ण सहकार्य करेल हा आगळा कार्यक्रम कदाचित महाराष्ट्रातला एकमेव कार्यक्रम असेल की जो सर्व जाती धर्मातील बांधवांना सोबत घेऊन करत आहात या कार्यक्रमाची कौतुक केले

या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील कारागरांना त्यांच्या कलेचा सन्मान म्हणून प्रभू शुगर यांची प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये कृषी विभागाच्या योजना श्री सुरडकर साहेब खादी ग्रामोद्योग च्या योजना श्री गजानन पाटील कामगार यांनी माहिती दिली

कौशल्य विकास योजनेच्या योजनेची माहिती श्रीपाद परळीकर साहेब यांनी दिली

महिला उद्योजिका रेखाते बोरकर यांनी सांगितले की महिलांनी सुद्धा आपल्या कुटुंबा व्यतिरिक्त आपल्यामधील असलेली कला जोपासली पाहिजेत आपल्याला जी जी काही करता येते ते व्यवसायामध्ये रूपांतर केले पाहिजे त्यासाठी मी मदत करेल कामगार विभागाच्या योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते

या कार्यक्रमासाठी निर्मिती क्षेत्रात काम करणारे अनेक कामगार हजर होते महिला भगिनी मोठ्या प्रमाणात हजर होत्या

आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून श्री सुनील भोजवणी यांनी कामगारांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले वॉटर फिल्टर ची वाटप स्वरूपात करण्यात आले

कार्यक्रमानंतर महाप्रसादाची वाटप करण्यात आले हा आगळगाव कार्यक्रम जो सर्व कार्यक्रम सोबत घेऊन करण्यात आला याची कौतुक मान्यवरांनी केले

# आज स्नेहलताई उद्या कोण?

## सरकार कोणासाठी?

## निर्दोष मरतात गुन्हेगार मोकाट फिरतात..

जनसंचलन/बुलढाणा



स्नेहल संदीप चौधरी या युवतीच्या १० फेब्रुवारी रोजी अपघाती निधनाची दुदैवी बातमी धडकली अन् समाजमन सुन्न झाले.आज सायंकाळी ६ वाजता चांडक लेआउट ते त्रिशरण चौक कॅन्डल मार्च काढण्यात येणार आहे. दरम्यान आज स्नेहलताई उद्या कोण?, सरकार कोणासाठी?, निर्दोष मरतात गुन्हेगार मोकाट फिरतात.. हे अन्यायाचं राज्य आहे का?असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत असूनही, लोकांना कायद्याचा आदर किंवा भीती नसल्याने मृत्यूंचे प्रमाण वाढले आहे.अपघातांच्या घटनांना ब्रेक लागत नाही,हे दुर्दैव आहे. त्रिशरण चौकात अपघात झाला आणि या अपघातात एक २४ वर्षीय मुलगी गतप्राण झाली. या मुलीचे नाव शितल संदीप चौधरी असे आहे.एका बोलेरो गाडीने मुलीचा जीव घेतला.मुली सोबत तिची आई सुद्धा गंभीर जखमी झाली होती.दरम्यान आज सायंकाळी सहा वाजता चांडक लेआउट ते त्रिशरण चौक दरम्यान कॅन्डल मार्च काढण्यात येणार आहे.

# पुण्यही विधात्या माझे पाप कर.. पण मला एका मुलीचा बाप कर!

## जुळ्या चिमुकलींचे फटाक्याच्या आतिषबाजीत व ढोल ताश्याच्या गजरात अनोखे स्वागत..!

जनसंचलन/बुलढाणा

पुण्य ही विधात्या माझे पाप कर.. पण मला एका मुलीचा बाप कर या गझलकार गोपाल मापारी यांच्या ओळी मुलींच्या जन्माचे महत्व अधोरेखित करतात. मुलींचा घटता जन्मदर चिंताजनक असतांना समाजातील काही धुरणींकडून लेक वाचवा लेक वाढवा अभियान राबविल्या जात आहे. बुलढाणा शहरातील उद्योजक श्री रूपराव उबाळे पाटील यांचे चिरंजीव श्री ऋषिकेश उबाळे पाटील दांपत्यांना दोन जुळ्या मुली झाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा असाच होता. १८ जानेवारी रोजी ऋषिकेश उबाळे यांना दोन कन्यारत्न झाल्यानंतर त्यांचा ९ फेब्रुवारी रोजी घरी आगमन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात उबाळे परिवाराने या कन्याचे जोरदार स्वागत केले फटाके ढोल ताशे वाजत गाजत रॅली द्वारे आनंद साजरा करण्यात आला. या वेळी बुलढाणा येथील जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.भागवत



भुसारी, मुलीचे आजोबा श्री रुपराव उबाळे वाजी सौ उबाळे तसेच उबाळे, शिंदे, साखरे, तळेकर यांच्या परिवारातील सर्व व नातेवाईक मंडळी, व तानाजी नगर येथील सर्व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958